# दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर
## शैक्षणिक वर्षे २०१५-२०१६ (अहवाल)

१] **नविन अभ्यासक्रम प्रस्ताव :-**

i) एम. एस्सी. गणित ii) एम. एस्सी. पदार्थ विज्ञान iii) बी. एस्सी. मध्ये बिजनेस मॅथेमॅटीक्स नविन विषय

२] **युजीसी :-**

महाविद्यालयास युजीसी कॉलेज विथ पोट्यॅनशियल फॉर एक्सलन्स (CPE) या योजनेसाठी प्रस्तुतीकरण बैठकीसाठी बोलावण्यात आले (एकूण अनुदान ५ Cr. पाच वर्षासाठी)

३] डिएसटी (संशोधन प्रकल्प) Understanding the nature of X - ray bright optical normal galxies:-

i) डॉ पांडुरंग पंडगे या विद्यार्थ्यांस डिएसटी च्या AORC योजने अंतर्गत इन्सपायर फॅकल्टी अवार्ड मिळाले एकूण अनुदान १ कोटी महाविद्यालयामध्ये हा विद्यार्थी या योजनेअंतर्गत रुजु झाला आहे. तसेच डिएसटी च्या Youg Scientist Scheme मध्येही डॉ. पांडुरंग पंडगे यांची निवड झाली. एकूण अनुदान २७ लाख रुपये

४] लोकमत महाराष्ट्र शिक्षण तज्ञ आयकॉन पुरस्कार पुणे येथे २० मार्च, २०१६ रोजी लोकमत समुहाच्या वतिने आयोजित महाराष्ट्र शिक्षण तज्ञ आयकॉन पुरस्कार या कार्यक्रमामध्ये एम एच आर डी मंत्री श्रीमती स्मृती इराणी व राज्याचे शिक्षणमंत्री श्री. विनोदजी तावडे यांच्या समवेत उच्च शिक्षणावरती चर्चात्मक कार्यक्रमात प्राचार्य डॉ जयप्रकाश दरगड यांनी दयानंद शिक्षण संस्थेच्या वतिने लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले व सहभाग नोंदवीला.

५] दि.१७ - २२ सप्टेंबर, २०१६ दरम्याण २०० निवडक विद्यार्थ्यांसाठी इन्सपायर सायन्स कॅम्पचे आयोजन करण्यात आले.

६] गणित व पदार्थ विज्ञान विभागास संशोनध केंद्राची मान्यता.

७] **महाविद्यालयाने UGC-Skill development Scheme अंतर्गत** i) Animaetion and Multimedia ii) Mobile Communication Technology या ३ वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव पाठवण्यिात आले एकूण अनुदान ५ कोटी रु.

८] दिनांक १४ एप्रिल - ३० एप्रिल २०१६ दरम्यान पदार्थ विज्ञान विषयामध्ये Indian Academy of Science, Banglore यांच्या मार्फत रिफ्रेशर कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. एकुण अनुदान ७ लाख ७ हजार रुपये.

७] गणित विभागातर्फे बि एस्सी गणित विषयाच्या अभ्यासक्रमावरती एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन.

८] गणित विषयामध्ये UGC - COC अंतर्गत Matlab Training या कोर्सची सुरुवात केली.

९] **Refresher a Orientation Courses केलेल्या प्राध्यापकांची नावे -**

१) डॉ. एस. एस. बेल्लाळे २) डॉ. एम. ए. बेंबडे ३) डॉ. एल. व्ही. ठाकरे ४) प्रा. एम. एम. पंडित
५) डॉ. सी. एस. स्वामी ६) डॉ. आर. व्ही. किर्तने ७) डॉ. व्हि. डी. मोटे

१०] **प्राध्यापकांचे संशोधन कार्य :-**

१) प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांचे एकंदरीत शैक्षणिक वर्षामध्ये ६ संशोधन शोध निबंध आंतराष्ट्रीय शोध पत्रिकेमधून प्रकाशीत झाले. त्यामध्ये विशेष शोध निबंध Impact factor ५.२ च्या नियत कालीकेत झालेले आहेत हे विशेष.

२) रसायन शास्त्रामध्ये डॉ. एन. एस. कोरडे, डॉ. जे. ए. अनगुलवार यांचेही प्रत्येकी २ शोध निबंध प्रकाशित झाले.

३) प्रा. डॉ एस एस बेल्लाळे यांचे कुंगनय विद्यापीठ, मसन साऊथ कोरिया येथे आंतर राष्ट्रीय परिषदेमध्ये शोधनिबंध सादर.

४) डॉ. एस एस बेल्लाळे यांनी DST कडे संशोधन प्रकल्प प्रस्ताव पाठविण्यात आला. एकूण अनुदान २४६०००/-

५) डॉ. एस एस बेल्लाळे यांचे एकूण ६ संशोधन शोध निबंध आंतर राष्ट्रीय संशोधन नियतकालीकेत प्रकाशित.

६) डॉ. एस एस बेल्लाळे यांचे आंतर राष्ट्रीय ३ संशोधन नियतकालीकेसाठी इडीटोरीयल बोर्डसाठी निवड.

७) डॉ. व्ही डी मोटे यांची मटेरियल सायन्स मध्ये ३ आंतर राष्ट्रीय शोध नियतकालीकेमध्ये संशोधन कार्याचे प्रकाशन.

८) डॉ. व्ही डी मोटे यांची २०१६ Global Confernce on Polymer and Composite meterial व International Nano letters या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी Reviewer म्हणून निवड.

९) प्राचार्य डॉ जयप्रकाश दरगड, डॉ आर व्ही सोळुंके, प्रा एस के आळणे, डॉ आर व्ही किर्तने, डॉ एन एस कोरडे, डॉ जे ए अनगुलवार, डॉ पांडुरंग पंडगे यांचे विविध आंतर राष्ट्रीय संशोधन परिषदेमध्ये शोध निबंधाचे वाचन करण्यात आले.

१०) डॉ व्ही ए चौधरी यांना बेस्ट पेपर प्रझेंटेशन Award प्राप्त झाला.

११] आंतर राष्ट्रीय संशोधन नियतकालीकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ जयप्रकाश दरगड यांच्या मुख्य संपादक असलेल्या "Universal Science & Technology" व डॉ एस एस बेल्लाळे यांचे मुख्य संपादक असलेल्या International Journal of Universal Mathematics and Mathematical Sciences या दोन आंतर राष्ट्रीय संशाधेन शोध नियत कालीकांचे प्रकाशन करण्यात आले.

१२] **विद्यार्थ्यांचे यश :-**

१) विद्यापीठ परिक्षेतील गुणवंत विद्यार्थी -

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | गुण % | विद्यापीठातील गुणवत्ता क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १) | देवणे रेणुका संजय | बी एस्सी | ८९.४२ | तृतीय क्रमांक |
| २) | हावळे पुनम सत्तेश्वर | बी एस्सी बायोटेक्नॉलॉजी | ७४.३३ | तृतीय क्रमांक |
| ३) | काळदाते रणजीत विश्वास | एम एस्सी रसायनशास्त्र | ७५.४२ | तृतीय क्रमांक |
| ४) | पाटील भाग्यश्री शहाजी | एम एस्सी रसायनशास्त्र | ७५.४२ | तृतीय क्रमांक |
| ५) | पटेल जुफरोहिन अहमदखान | एम एस्सी सुक्ष्मजिवशास्त्र | ६८.१७ | द्वितीय क्रमांक |

२) काळदात रणजीत विश्वास याला सेंद्रीय रसायनशास्त्र या विषयामध्ये विद्यापीठातुन सुवर्ण पदक पटकावले.

३) मराठवाडा मॅथेमॅटिकल सेमिनार कॉम्पीटीशन या मराठवाडा स्तरीय घेण्यात आलेल्या गणित विषयाच्या स्पर्धा मध्ये महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी i) अग्रवाल साक्षी (विद्यापीठातुन पहिली) ii) स्नेहल जावळे (विद्यापीठातुन तीसरी) iii) सतीश पांचाळ (विद्यापीठातुन चौथा) क्रमांक पटकावुन यश प्राप्त केले.

४) कु. दिक्षाराणी सुर्यवंशी हिने राज्यस्तरीय झालेल्या विविध ठिकाणी वक्तृत्व स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केलेले आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस दल (रेझींग डे) | - | लातूर | - | (प्रथम) |
| २. | जयक्रांती महाविद्यालय (वाद विवाद स्पर्धा) | - | लातूर | - | (द्वितीय) |
| ३. | जिल्हा क्रिडा विभाग परभणी | - | परभणी | - | (प्रथम) |
| ४. | विभागीय क्रिडा युवक महोत्सव | - | औरंगाबाद | - | (प्रथम) |
| ५. | राज्यस्तरीय क्रिडा युवक महोत्सव | - | पुणे | - | (द्वितीय) |
| ६. | राष्ट्रीय क्रिडा युवक महोत्सव | - | छत्तीसगड (रायपुर) | - | (सहभाग) |
| ७. | एम्बस वक्तृत्त्व | - | लातूर | - | (द्वितीय) |
| ८. | मराठवाड्याचा युवा वक्ता | - | लातूर | - | (सहभाग) |
| ९. | जिल्हास्तरीय स्वच्छतामित्र | - | लातूर | - | (द्वितीय) |
| वक्तृत्त्व करंडक स्पर्धा २०१५-१६ | | | | | |
| १०. | राज्यस्तरीय स्वच्छतामित्र | - | लातूर | - | (द्वितीय) |
| वक्तृत्त्व करंडक स्पर्धा | | | | | |
| ११. | योगेश्वरी महाविद्यालय वक्तृत्त्व स्पर्धा | - | अंबाजोगाई | - | (सहभाग) |
| १२. | युवक महोत्सव नांदेड वाद विवाद स्पर्धा | - | नांदेड | - | (प्रथम) |
| १३. | बहुजन मुलनिवासी बाबासाहेब आंबेडकर | - | लातूर | - | (प्रथम) |
| वक्तृत्त्व स्पर्धा | | | | | |

५) सहयोग २०१५ या युवक महोत्सवामध्ये कु. अपेक्षा चाकोते व कु. दिक्षाराणी सुर्यवंशी या विद्यार्थीनीस वादवीवाद (मराठी) स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषक व चि. सुमित हसाळे या विद्यार्थ्यास नक्कला या कला प्रकारात द्वितीय पारितोषीक मिळाले.

## १३] Sport (क्रिडा) -

१) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात आमच्या दयानंद विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील क्रीडा प्रतिनिधी पदी श्री. कुणाल ठाकूर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

२) श्री. सौरभ जांभळे याने 'अ' विभाग आंतर महाविद्यालयीन हॅमर थ्रो स्पर्धेत सर्व व्दितीय क्रमांक पटकावीला.
आमच्या महाविद्यायलयाच्या बॅडमिंटन मूलांच्या संघाने 'अ' विभाग आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये सर्व व्दितीय येण्याचा मान मिळवला. या संघात १. कोरे सूरज २. बोमनाळे साईनाथ ३. ओंकार सूतार ४. काठेवाड रोहित ५.अक्षय खराडे या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

३)तसेच आमच्या महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने 'अ' विभाग आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत सलग तिसऱ्या

वर्षी विजेतेपद प्राप्त केले. त्याच बरोबर या संघाने विद्यापीठ स्तरावरील आंतर महाविद्यायलयीन क्रिकेट स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केले.

४)या संघातील श्री. सौरभ जांभळे, कुणाल ठाकूर व श्री. संदीप नरवाडे यांची हरीसिंह गौर विद्यापीठ सागर (मध्यप्रदेश) येथे आयोजित आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धे करिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संघात निवड करण्यात आली होती. याच बरोबर श्री. अभिषेक शिदोरे या विद्यार्थ्याची आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धा, फगवाडा (पंजाब) करिता आयोजित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संघात निवड करण्यात आली होती. समाधान सोनटक्के या विद्यार्थ्याची आंतर विद्यापीठ बेसबॉल स्पर्धा, पंजाबी विद्यापीठ चंदीगढ (पंजाब) करिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संघात निवड करण्यात आली आहे.

५)क्रीडा विभागामार्फत चालू शैक्षणिक वर्षात 'अ' विभाग आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल मुले व मुली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यापीठ स्तरीय आंतर विभाग क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

६)तसेच दि. ०१.०२.२०१६ ते ०८.०२.२०१६ या कालावधीत विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल संघाचे सराव शिबीर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. व दि. ११.०२.२०१६ ते १९.०२.२०१६ या कालावधीत विद्यापीठाच्या बेसबॉल संघाचे सराव शिबीर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

७)तसेच इयत्ता ११ वी वर्गातील विद्यार्थी चि. अमर सिंह संजय रोंगे या विद्यार्थ्याने १९ वर्ष वयोगटात बेसबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करुन छत्तीसगड (बीलासपुर) या ठिकाणी झालेल्या बेसबॉल स्पर्धेत कास्यपदक पटकावीले.

८)इयत्ता ११ वी वर्गातील विद्यार्थीनी सुकन्या बिराजदार हिने १९ वर्ष वयोगटात राज्यस्तरीय थांगता स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवुन दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व केले.

१४] **Gandhi Vichar Sanskar Exam (गांधी विचार संस्कार परिक्षा) :-** गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव परीक्षेचे आयोजन आमच्या महाविद्यालयात दिनांक १७.१०.२०१५ रोजी करण्यात आले होते. परिक्षेचे माध्यम हिंदी भाषा होती. त्यापैकी ४० विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली.

१५] **एन एस एस -**

१)दिनांक २४ सप्टेंबर रा.से.यो. दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वनस्पती उद्यानामध्ये परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. जे.एस. दरगड, राष्ट्रीय सेवा योजने चे कार्यक्रमाधिकारी, सदस्य व स्वयंसेवक उपस्थित होते. यामध्ये १४० स्वंयसेवकांनी सहभाग घेतला - ५ तास काम केले.

२)दिनांक २ ऑक्टोंबर २०१५ रोजी गांधीजी जयंती निमित्त लातूर येथील मातोश्री वृध्दाश्रम स्वच्छ करण्यात आला. त्यात ३५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम ३ तास राबविण्यात आला.

३) दिनांक ०९ ऑक्टोंबर २०१५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या अंतर्गत राबविण्यात आलेल्या कॅन्सर जनजागृती मोहिमेमध्ये २५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. ही मोहिम ३ तास राबविण्यात आली.

४)दि. १५ ऑक्टोंबर २०१५ रोजी स्वच्छ भारत अभियान निमित्त दयानंद विज्ञान महाविद्यालय ते जिल्हा क्रिडा संकुलन लातूर पर्यंत स्वच्छता रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये १४३ स्वयं-सेवकांनी सहभाग नोंदविला. हा

कार्यक्रम ५ तास राबविण्यात आला.

५) पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी विशेष युवक शिबीर आख्ररवाई ता.जि. लातूर येथे दि.०१.०१.२०१६ ते दि०७.०१.२०१६ या कालावधीत घेण्यात आले.

## १६] NCC Department (एन सी सी विभाग) -

### सामाजीक कार्य -

१) टाऊन हॉल लातूर येथे स्वच्छता अभियान राबवीले.

२) एकता रॅली टाऊन हॉल ते पुरनमल लाहोटी पॉलटेक्नीक कॉलेज मैदान येथे सहभाग नोंदवीला.

### यश संपादन :-

१) ८३.३३% बी प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल व १००% सी प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल लागला.

२) कंपनी कमांडर म्हणून ATC कॅम्प नांदेड येथे कॅडेटची निवड झाली.

३) ATC कॅम्प नांदेड येथे क्रिडा स्पर्धेत ६ कॅडेटला सुवर्ण पदक मिळाले.

४) ATC कॅम्प नांदेड येथे फायरींग मध्ये अंकीत नाडे याला सुवर्ण पदक मिळाले.

५) ATC कॅम्प औरंगाबाद येथे क्रिडा स्पर्धेत ५ कॅडेटला ब्रॉझ पदक मिळाले.

६) ज्ञानेश्वर हरिशचंद्र नाडे याला ATC कॅम्प औरंगाबाद येथे बेस्ट कॅडेट अवार्ड मिळाला.

७) अवदुंबर शिंदे याला ATC कॅम्प औरंगाबाद येथे बेस्ट कॅडेट अवार्ड मिळाला.